**प्रेसनोट :—** दिनांक :— ०२/०८/२०२१

फिर्यादी याचे आरे मिल्क वसाहत, गोरेगाव, मुंबई येथे स्वत:च्या मालकीचे घर व दुकान आहे. सदर घर व दुकानाची कागदपत्रे ही योग्य नसून, सदर घर व दुकान अनधिकृत असल्याबाबत कारवाई न करण्यासाठी गुन्हयातील आलोसे यांनी फिर्यादी कडे रू २५,०००/— ची मागणी केली व पहीला हप्ता म्हणून रू १०,०००/— स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३३/२०२१ |
| कलम | कलम — ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी इसम | उदास दाजी तुळसे, वय ४८ वर्षे, धंदा—नोकरी (उप मुख्य दक्षता अधिकारी, आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी सी फेस, मुंबई —४०००१८ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २५,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १०,०००/— |
| थोडक्यात माहिति | यातील फिर्यादी हयाचे आरे मिल्क कॉलनी, गोरेगाव, मुंबई येथे स्वत:चे मालकीचे घर व दुकान आहे. सदर घर व दुकाना संदर्भात आलोसे उदास दाजी तुळसे यांचे कडे तक्रार प्राप्त झाली होती, त्या संदर्भात आलोसे यांनी फिर्यादीला संपर्क करून सदर घराची व दुकानाची कागदपत्रे घेवून दि २९/७/२०२१ रोजी वरळी दुग्धालय, वरळी मुंबई येथील कार्यालयात बोलावले होते, दि. २९/०७/२०२१ रोजी फिर्यादी आलोसे याना त्याचे कार्यालयात भेटले असता, त्यांनी ती फिर्यादी कडील कागदपत्रे पाहून योग्य नसल्याचे सांगून सदर घर व दुकान हे अनधिकृत असल्याची कारवाई करण्यात येईल असे सांगितले. सदरची कारवाई टाळायची असल्यास फिर्यादी कडे आलोसे यांनी रू २५,०००/— लाचेची मागणी केली<br><br>फिर्यादीस आलोसे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. ३०/०७/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात तक्रार दिली.<br><br>फिर्यादीचे तक्रारीवरून दि. ०२/०८/२०२१ रोजी पडताळणी करण्यात आली, पडताळणी दरम्यान आलोसे यांनी फिर्यादी कडे रू २५,०००/— इतक्या लाचेची रक्कमेची मागणी करून रू १०,०००/— चा पहिला हप्ता स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्याच दिवशी आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी फिर्यादी कडून रू १०,०००/— इतक्या रक्कमेचा लाचेचा पहिला हप्ता स्विकारला असता, त्याना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला. |

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in, ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप www.acbmaharashtra.net

Scanned with CamScanner